# <u>औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद</u>

जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१९/२०१.                                                    दिनांक :- ०८/०२/२०१९.

## <u>सविस्तर जाहिरात</u>

**१)** कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), महानगरपालिका औरंगाबाद संवर्गातील सरळसेवेने रिक्त असलेल्या ११ पदांच्या भरतीकरीता औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत रविवार दिनांक २४/०२/२०१९ रोजी **देवगिरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय व देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालय,स्टेशन रोड, औरंगाबाद** या केंद्रावर परीक्षा घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत विहित केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी येताना संपूर्ण भरलेला अर्ज, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे, परीक्षा फी भरल्याची पावती, जात, वय, शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, समांतर आरक्षणाचा लाभ घेत असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, प्रवेशपत्र स्वतः प्रिंट काढून सर्व रकाने पूर्णपणे भरुन परीक्षेस येताना दिनांक २४/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व कागदपत्रांसह,अर्जासह केंद्रावर हजर राहावे. त्याच दिवशी उमेदवारांची परीक्षा घेण्यात येईल.

**२) <u>पदाचा तपशील</u> :-**

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)                    वेतनश्रेणी - रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४,३००/-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.व.शै. मागास वर्ग | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | २ | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | ५ | ० | **११** |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | |
| महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ० | **४** |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | **१** |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | **१** |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | १ | ० | **५** |
| दिव्यांग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **२** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **१** | **२** | **५** | **०** | **११** |

**(टिप :- पदोन्नती किंवा इतर कारणांमुळे पदसंख्येत बदल होऊ शकतो.)**

**३) <u>शैक्षणिक पात्रता</u>** :- उमेदवाराने खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरातीच्या दिनांकास पूर्ण असणे आवश्यक आहे.

| **पदनाम** | **आवश्यक शैक्षणिक अर्हता** |
|---|---|
| कनिष्ठ अभियंता | स्थापत्य अभियांत्रिकी यामधील पदवी किंवा पदविका. |

**४) <u>किमान व कमाल वयोमर्यादा</u>** :-दि.१/२/२०१९ रोजी असणारे उमेदवाराचे वय विचारात घेतले जाईल.

| **अक्र** | **प्रवर्ग** | **कमाल वयोमर्यादा** |
|---|---|---|
| १. | मागासवर्गीय | ४३ वर्षे |
| २. | माजी सैनिक | |
| | अ) सेवानिवृत्त माजी सैनिक (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१६/४/१९८१ मधील तरतुदीनुसार) | <u>अ.ज. व अ.जा. प्रवर्गातील माजी सैनिक</u> - ४३ वर्षे + सेवेचा कालावधी + ३ वर्षे. |
| | ब) सेवानिवृत्त दिव्यांग माजी सैनिक (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२०/४/२०१० मधील तरतुदीनुसार) | ४५ वर्षे |
| ३. | अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| ४. | औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आधीपासून कायम सेवेत असल्यास ते खेरीज करुन ३० वर्षाहून अधिक नसावे. | |
| ५. | शासन निर्णय दि.६/१०/२०१० अन्वये | |
| | अ) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य | ४५ वर्षे |
| | ब) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी | ४५ वर्षे |
| | क) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी | ४५ वर्षे |

**५) <u>परीक्षा योजना</u> :-** भरती परीक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न स्वरुपाची असून OMR आधारित उत्तरपत्रिकेवर उमेदवाराने परीक्षा द्यावयाची आहे.

| **विषय** | **प्रश्न संख्या** | **गुण** | **दर्जा** | **माध्यम** | **अभ्यासक्रम** |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | १० | २० | बारावी | मराठी | समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द तसेच सामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे. |
| इंग्रजी | १० | २० | पदवी | इंग्रजी | Similar Word, Opposite Word, Common Vocabulary, Sentence Structure, Grammar, Use of Idioms & Phrases & their meaning and Comprehension of Passage. |
| सामान्य ज्ञान | १० | २० | - | इंग्रजी | चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषतः औरंगाबाद व महाराष्ट्राचा, औरंगाबाद व महाराष्ट्राचा भुगोल,भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राजव्यवस्था तसेच पर्यावरण. |
| बुध्दिमापन चाचणी | १० | २० | - | इंग्रजी | आकलन, वैयक्तिक कौशल्य, तार्किक तर्क आणि विश्लेषणात्मक क्षमता, निर्णय निर्धारण आणि समस्येचे निराकरण, सर्वसामान्य मानसिक क्षमता, मूलभूत संख्याशास्त्र, माहितीचे पृथक्करण. |
| अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी | ६० | १२० | पदवी/ पदवीका | इंग्रजी | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी/पदविका संबंधित प्रश्न. |
| **एकूण :-** | **१००** | **२००** | | | |

**६) A) परीक्षा फी भरण्याची कार्यपध्दती :-**

- औरंगाबाद महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org या संकेतस्थळावर 'कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)' भरती २०१९ ची जाहिरात PDF स्वरुपात उपलब्ध आहे.
- उमेदवाराने उक्त संकेतस्थळावरुन सदर जाहिरात डाऊनलोड करुन त्यातील संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचावी.
- राखीव प्रवर्गासाठी (महिला, मागासवर्ग, माजी सैनिक, अंशकालीन इ.) परीक्षा फी रु.३००/- भरण्यासाठी https://sbionline या वेबसाईट आधारे परीक्षा फी उमेदवाराने भरावी. यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर खालील लिंकवर https://www.onlinesbi.com/sbicollect/icollecthome.htm?corpID=938905 जाऊन SBI Collect वर जाता येईल. Terms & Conditions ला (√) अशी खूण करुन proceed ला क्लिक करणे. त्यानंतर Deputy Commissioner (Revenue), Municipal Corporation, Aurangabad चे page display होईल. त्यात select payment category ला click केल्यावर Exam Fee चे option येईल. Exam Fees ला click केल्यावर webpage open होईल. त्यात उमेदवाराने त्याच्याशी संबंधित माहिती उमेदवाराचे संपूर्ण नांव, जन्म दिनांक, जात, समांतर आरक्षणाचा प्रवर्ग, आधार कार्ड क्रमांक, शैक्षणिक पात्रता, परीक्षा फी रक्कम इ. माहिती भरणे. त्यास submit केल्यावर payment options येतील. उमेदवाराने हवा असलेला पर्याय निवडून परीक्षा फी online भरणे. फी भरल्याची पावतीची प्रिंट काढून अर्जासोबत परीक्षा केंद्रावर सादर करणे. सदर **online** फी दि.११/०२/२०१९ ते दि.२३/०२/२०१९ पर्यंत उमेदवारास भरता येईल. सर्व उमेदवारांना विनंती करण्यात येते की,त्यांनी अंतिम तारखेची वाट न पाहता तात्काळ ऑनलाईन परीक्षा फी भरावी.

**परीक्षा फी ऑनलाईन भरण्यासाठीचे टप्पे**

www.aurangabadmahapalika.org

↓

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) परीक्षा फी भरणा लिंक

(https://www.onlinesbi.com/sbicollect/ icollecthome. htm?corpID=938905)

↓

SBI Collect

↓

Terms & Conditions ला (√) अशी खूण करणे

↓

Proceed

↓

Deputy Commissioner (Revenue),Municipal Corporation, Aurangabad चे page display

↓

select payment category

↓

Exam fee

↓

उमेदवाराने त्याच्याशी संबंधित माहिती उमेदवाराचे संपूर्ण नांव, जन्म दिनांक, जात, समांतर आरक्षणाचा प्रवर्ग, आधार कार्ड क्रमांक, शैक्षणिक पात्रता इ. माहिती भरुन submit करणे.

↓

payment options

↓

पर्याय निवडून online परीक्षा फी रु.३००/- भरणे.

↓

फी भरल्याची पावतीची प्रिंट काढून अर्जासोबत परीक्षा केंद्रावर सादर करणे.

**६) B) अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१) दि.२४ फेब्रुवारी २०१९ (रविवार) रोजी देवगिरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय व देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालय, (वेदांत हॉटेलकडील गेटवर),स्टेशन रोड, औरंगाबाद येथे दुपारी ११.०० ते १२.०० दरम्यान उमेदवारांनी थेट हजर रहावे.

२) भरती प्रक्रियेसाठी उमेदवाराने महानगरपालिकेत परीक्षेपूर्वी अर्ज जमा करण्याची आवश्यकता नाही.

३) भरतीबाबत सविस्तर जाहिरात www.aurangabadmahapalika.org या औरंगाबाद महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पीडीएफ स्वरुपात उपलब्ध आहे.

४) सदर जाहिरात सविस्तर वाचून डाऊनलोड करुन त्यात जोडलेल्या नमुन्यात संपूर्ण भरलेला अर्ज, प्रवेशपत्र दोन प्रतीत, अर्जासोबत जोडावयाची सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकित करुन छायांकित प्रतीसह परीक्षा केंद्रावर दि.२४ फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी ११.०० ते १२.०० च्या दरम्यान हजर व्हावे. सकाळी ११.०० च्या पूर्वी आणि दुपारी १२.०० वाजेनंतर उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराने परीक्षा केंद्रात प्रवेश केल्यावर त्यांच्याकडून अर्ज व कागदपत्रे जमा करुन घेतले जातील. त्यानंतर OMR शीटवर बहुपर्यायी विकल्प स्वरुपाची दोन तासांची आणि २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत उमेदवारास परीक्षा केंद्र सोडता येणार नाही. परीक्षा संपल्यानंतर लगेचच OMR आधारित उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन करुन आरक्षणनिहाय निवडयादी त्याचदिवशी औरंगाबाद महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी दि.२५ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मूळ कागदपत्रांसह औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात (टाऊन हॉल) हजर रहावयाचे आहे.

५) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर दि.२४ फेब्रुवारी २०१९ रोजी येताना प्रवेशपत्र स्वत: प्रिंट करुन (दोन प्रतीत) त्यावर फोटो चिटकवून संपूर्ण माहिती भरुन तसेच विहित नमुन्यातील अर्ज, जाहिरातीत नमूद केलेली कागदपत्रे स्वसाक्षांकित करुन (संपूर्ण भरलेला अर्ज, शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, स्थापत्य अभियांत्रिकी पदवी किंवा पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र, आधारकार्ड वा ओळखीचा पुरावा, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, समांतर आरक्षणाचा लाभ घेत असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र, SBI Collect आधारे परीक्षा फी भरल्याची पावती, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रांसह हजर रहावयाचे आहे. प्रवेशपत्राशिवाय परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) सदरील परीक्षेसाठी Online Fee भरण्याची सुविधा SBI Collect या Online platform द्वारा उपलब्ध करण्यात आली असून दि.२३ फेब्रुवारी २०१९ पर्यंत उमेदवारांना फी भरणे आवश्यक आहे. परीक्षा फी भरण्याबद्दल सविस्तर माहिती जाहिरातीत दिली आहे. तसेच https://www.onlinesbi.com/sbicollect/icollecthome.htm?corpID=938905 या link वर जाऊन उमेदवाराने Online परीक्षा फी भरणे आवश्यक आहे.

- **अर्जदाराने अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे - (स्वत: साक्षांकित करुन छायांकित प्रतीत)**

  १) विहित नमुन्यातील अर्ज.
  २) प्रवेशपत्र (दोन प्रतीत) फोटो लावून स्वयंसाक्षांकित केलेले.
  ३) वयाचा पुरावा - शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.
  ४) शैक्षणिक पुरावा - स्थापत्य अभियांत्रिकी पदवी/पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र.
  ५) ओळखपत्र - आधारकार्ड किंवा पॅनकार्ड.
  ६) जातीचा पुरावा - जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र.
  ७) समांतर आरक्षण पुरावा - सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.
  ८) परीक्षा फी भरल्याची पावती - SBI Collect आधारे.

अर्जदाराने सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा संच न चुकता सोबत आणावे. सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकीत असावीत. **परीक्षेपूर्वी अर्ज महानगरपालिकेत जमा करण्याची आवश्यकता नाही.** अर्जदाराने अर्जावर व प्रवेशपत्रावर स्वतःचा अलिकडील रंगीत फोटो न चुकता लावावा. फोटोवर स्वतःची स्वाक्षरी करावी. अर्ज पूर्ण भरलेला असावा.

**६) C) प्रवेशपत्र :-**

परीक्षेस येतेवेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेशपत्र दोन प्रतीत आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षेस येतेवेळी ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकीत रंगीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेले प्रमाणपत्र, नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकीत प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**६) D) परीक्षेस प्रवेश :-**

फक्त बॉलपेन (काळा),काळ्या शाईचा बॉलपॉईट पेनाचा वापर करणे आवश्यक आहे. प्रवेशपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची रंगीत छायांकीत प्रत, अर्ज, अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे इ. परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवारास प्रवेश देण्यात येईल. स्मार्टवॉच, डिजीटल वॉच, मोबाईल फोन, मायक्रोफोन, कॅमेरा अंर्तभूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्ल्युटूथ, दुरसंचाराची साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणत्याही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वह्या, नोटस्, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, कॅलक्युलेटर इ. साधने/साहित्य परीक्षा कक्षात आणण्यास, स्वतःजवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास वा त्यांच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास मनाई असून ते सोबत आणू नये.

७) भटक्या जमाती (क), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग यामधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले अलिकडचे/नवीनतम मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) तसेच प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणावे.

८) ज्या उमेदवारांची निवड मागासवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांची निवड जात वैधता प्रमाणपत्राअभावी रद्द करण्यात येईल.

९) **महिलांसाठी आरक्षण** :- महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१, म.से.आ, २०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०१२/ प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३/८/२०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. ३०% महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) **सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)** :- सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.०५/१२/२०१८ व शुध्दीपत्रक दि.१९/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र शासनाने सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गासाठी १६% आरक्षण लागू केलेले आहे. या वर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दि.७/१२/२०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/ २०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि.१५/७/२०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गातील (ईएसबीसी) वर्गातील आरक्षणाकरीता ग्राह्य धरण्यात येतील. सदर आरक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन अर्ज करणे आवश्यक असून सदर उमेदवार सामाजिक, शैक्षणिक मागास प्रवर्गात मोडत असतील त्याचा उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांनी सामाजिक,शैक्षणिक मागास प्रवर्गामध्ये मोडत असल्याचा जातीचा दाखला तसेच सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले वैध प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेयर सर्टिफिकेट) व त्यानुषंगाने इतर आवश्यक कागदपत्रे परीक्षेच्या दिवशी अर्ज सादर करण्याच्यावेळी सोबत सादर करणे आवश्यक आहे.

११) **<u>अंशकालीन आरक्षण</u>** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सा.प्र.वि. पअंक १००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ, दि.२६/८/२००५ नुसार 'सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेले अशंकालीन उमेदवार त्या त्या पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असल्यास अर्ज करु शकतात. तसेच सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्र.पअंका-१९१३/ प्र.क्र.१९८/१६-अ, दि.१०/१०/२०१३ नुसार अट क्र.२ अन्वये शासन सेवेत प्रवेश मिळाल्यास त्यांनी त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्राकडून ३ वर्षाच्या अनुभवाची/अनुभवाबाबत मिळालेले मूळ प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या प्रतीसह नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१२) **<u>उमेदवारांना समान गुण मिळाल्यास</u>**:- लेखी परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम हा सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.१६/०६/२०१८ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१३) उपरोक्त समांतर आरक्षाणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणातंर्गत कप्पीकृत असून खुला प्रवर्ग वगळता ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येतील.

१४) **<u>सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>**

१) शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८/१६-ब. दि.०५/१२/२०१८ आणि शुध्दीपत्रक दि.१९/१२/२०१८ अन्वये पदभरती प्रक्रिया राबविण्याकरीता दि.३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत रिक्त असणारे आणि दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१२/२०१९ (भरती वर्ष-१) पर्यंतची संभाव्य रिक्त पदे विचारार्थ घेण्यात आलेली आहेत.

२) तसेच, स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. सदरील पदभरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी उद्‌भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

३) विवाहीत उमेदवारांच्या बाबतीत दि.२८/३/२००५ नंतर तिसरे अपत्य नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

४) समांतर आरक्षणाचे उमदेवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातून भरण्यात येईल.

५) उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशिला किंवा दबाव आणण्याचा प्रयत्न केला किंवा गैरप्रकाराचा अवलंब केला, तर त्यांची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

६) उमेदवारास परीक्षेस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल,त्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय राहणार नाही.

७) उमेदवाराने केवळ नमूद शैक्षणिक अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त होत नाही.

८) सदर भरती प्रचलित शासन निर्णयानुसार करण्यात येत असून आवश्यक ठिकाणी अद्ययावत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

९) छाननीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्वसूचना/नोटीस अथवा कारण न देता उमेदवारास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यात येईल. अशी प्रकरणी निर्माण होणाऱ्या सर्व परिणामांस संबंधित उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१०) जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्येत किंवा अटी-शर्तीमध्ये बदल करण्याचा किंवा जाहिरात पूर्णपणे रद्द करण्याचा तसेच निवडप्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर पूर्णपणे भरती प्रक्रिया रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार हे आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

११) शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४ दि.३१.१०.२००५ अन्वये दि.१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू ठरेल.

१२) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारास बंधनकारक राहतील.

१३) गुणानुक्रमे अंतिम निवड यादीवरील उमेदवारांना नियुक्ती देणेपुर्वी त्यांचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि संबंधित उमेदवाराचे पुर्वचारित्र्य व वर्तणूक तपासणी (पोलीस एन्क्वायरी) अहवाल समाधानकारक असणे बंधनकारक राहील.

१४) निवड झालेल्या उमेदवारांचा परिविक्षाधिन कालावधी दोन वर्षांचा राहील.

१५) लेखी परीक्षेतील गुणानुक्रम व सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड झालेल्या उमेदवारांची नांवे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डवर शक्यतो दि.२५ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ०९.०० वाजेपर्यंत जाहीर करण्यात येतील.

१६) या जाहिराती संबंधी उमेदवारास कुठल्याही शंका,अडचण असल्यास municipal corporationaur @gmail.com या ई-मेलवर पाठवावे.

१७) सदरची जाहिरात www.aurangabadmahapalika.org या औरंगाबाद महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

*स्वाक्षरित/-*
आयुक्त
महानगरपालिका औरंगाबाद

ठिकाण :- औरंगाबाद.
दिनांक :- ११/०२/२०१९.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

☎: २३३३५३६-४०,२३४८००१-०५ (P.B.X.), २३३१२८१, २३३१२८३ Fax :(०२४०) - २३३१२१३


## अर्जाचा नमुना

जातीचा प्रवर्ग :
समांतर आरक्षण :

अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो स्वत:च्या स्वाक्षरीसह

**प्रति,**
**मा. आयुक्त,**
**महानगरपालिका औरंगाबाद**

**विषय : "कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-क" या पदासाठी अर्ज.**

1. उमेदवाराचे नाव : --------------------------------------------------

(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

2. पत्रव्यवहाराचा पत्ता : ----------------------------------------------------------

----------------------------------------------------------

-----------------------------------पिन कोड --------------------

दूरध्वनी/मोबाईल क्रमांक : --------------------------------------

ई-मेल -------------------------------------------

3. जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) : / / .

4. वय (01.02.2019 रोजीचे) :

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

5. संवर्ग/जात/समांतर आरक्षण:खालील लागू असलेल्या संवर्गाचा क्रमांक चौकोनात ☐ (√खूण करणे)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.व.शै. मागास वर्ग | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | | | | | | | | | | | |
| माजी सैनिक | | | | | | | | | | | |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | | | |
| भूकंपग्रस्त | | | | | | | | | | | |
| खेळाडू | | | | | | | | | | | |
| अंशकालीन | | | | | | | | | | | |
| अनाथ | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | | | | | | | | | | | |

6. लिंग : पुरुष : ☐ / स्त्री : ☐

7. महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? होय : ☐ / नाही : ☐

8. जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक :

9. नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक (लागू असल्यास) :------------------------------

10. अर्जदाराचा शैक्षणिक पात्रतेचा तपशील

| अक्र | शैक्षणिक पात्रता | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1. | दहावी | | | |
| 2. | पदविका (स्थापत्य अभियांत्रिकी) | | | |
| 3. | पदवी (स्थापत्य अभियांत्रिकी) | | | |

11. नाव नोंदणी केलेल्या सेवायोजन /समाजकल्याण कार्यालयाचे नाव :----------------------

नोंदणी क्रमांक व दिनांक ---------------------------------------------------------

12. अर्जासोबत मी खालील नमूद कागदपत्रांची स्वत: साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती सोबत जोडल्या आहे.

| | | |
|---|---|---|
| विहित नमुन्यात भरलेला अर्ज | प्रवेशपत्र दोन प्रतीत | SBI Collect द्वारे परीक्षा शुल्क भरल्याची पावती |
| आधार कार्ड | शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र | स्थापत्य अभियांत्रिकी पदवी/ पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| जातीचे प्रमाणपत्र | नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असल्यास) | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र |
| माजी सैनिक / अंशकालीन (असल्यास) सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र | | |

वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. ती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास नोकरी गमविण्यास व अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहील व त्याबद्दलची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**अर्जदाराची सही**

**(नाव :-------------------------------------)**

**स्थळ** :-------------------

**दिनांक** :-------------------

# महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 अन्वये प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती ---------------------------------------------------------------
श्री.------------------------------------------------------- यांचा/ यांची मुलगा /मुलगी / पत्नी वय ------------ वर्ष, राहणार ------------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1. मी ------------------------------------------------------------ या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.
2. आज रोजी मला ------------- (संख्या) इतरी हयात अपत्ये आहेत. यापैकी दि. 28 मार्च, 2005 यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या --------------- इतकी आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)
3. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2005 नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**(नाव :-------------------------------------)**

**स्थळ** :-------------------

**दिनांक** :-------------------

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## - प्रवेशपत्र -

(दोन प्रतीत भरुन आणणे)

**परीक्षेचे नाव :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - भरती औरंगाबाद महानगरपालिका, २०१९.**

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक :-<br>(सदर क्रमांक परीक्षा केंद्रावर देण्यात येईल) | | उमेदवाराचे छायाचित्र |
| SBI Collect मार्फत परीक्षा फी भरल्याचा पावती क्रमांक | | |
| उमेदवाराचे संपूर्ण नांव :- | | |
| उमेदवाराचे बदललेले नांव :-<br>(असल्यास) | | |
| उमेदवाराची जन्म तारीख :- | | उमेदवाराची स्वाक्षरी |
| दि.०१/०२/२०१९ रोजी उमेदवाराचे वय :- | | |

| | |
|---|---|
| उमेदवाराची जात<br>(√ खूण करणे) | अ.जा. ☐ भ.ज.क. ☐ वि.मा.प्र. ☐ सा.व.शै.मा.व. ☐ इ.मा.व ☐<br>निरंक ☐ |
| उमेदवार समांतर आरक्षणाचा लाभ घेत असल्यास प्रवर्ग (√ खूण करणे) | महिला ☐ माजी सैनिक ☐ अंशकालीन ☐<br>सर्वसाधारण ☐ निरंक ☐ |

| | | |
|---|---|---|
| ओळखीचा पुरावा कोणता सादर केले, त्याचा क्रमांक | पुराव्याचे नांव | क्रमांक |
| लेखी परीक्षेचे ठिकाण :- | **देवगिरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालय, (वेदांत हॉटेलकडील गेटवर), रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद.** | |

| **मूळ अर्ज, कागदपत्रे व प्रवेशपत्र जमा करणे व लेखी परीक्षेचा वार व दिनांक** | **विषय** | **केंद्रावरील प्रवेश सकाळी ११.०० ते १२.००** |
|---|---|---|
| रविवार,<br>२४ फेब्रुवारी २०१९ | मूळ अर्ज, कागदपत्रे व दोन प्रतीतील प्रवेशपत्र जमा करणे. | कागदपत्रे जमा झाल्यानंतर दोन तासांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. |
| | लेखी परीक्षा<br>(वस्तुनिष्ठ बहुपर्यायी OMR आधारित परीक्षा) | |

**परीक्षा केंद्रावर उपस्थित**
**समवेक्षकाचे नाव व स्वाक्षरी**

**सूचना :-**

- उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर बैठक क्रमांक, परीक्षेसंबंधी इतर तपशीलाच्या लिखाणाकरीता, उत्तराच्या चिन्हांकरीता केवळ काळ्या शाईच्या बॉलपॉईंट पेनाचा वापर करणे आवश्यक आहे.
- उमेदवारांना सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. दि.२४/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपूर्वी व दुपारी १२.०० वाजेनंतर उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.
- विहित वेळेत सर्व कागदपत्रे संपूर्णपणे भरुन झेरॉक्स प्रती स्वसाक्षांकित करुन परीक्षा केंद्रावर हजर रहावे.
- उमेदवाराने परीक्षा केंद्रात प्रवेश केल्यावर कागदपत्रे जमा करणे व लेखी परीक्षा देणे ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत परीक्षा केंद्राचा हॉल उमेदवारास सोडता येणार नाही.